**जून १९९६ च्या वादळात मृत पावलेल्या बेपत्ता झालेल्या मच्छिमारांच्या कुटुंबियांना अर्थसहाय्य देण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि,पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः-मत्स्यवि-१०९६/२७२/पदुम-१४**
**मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.**
**दिनांकः- २ सप्टेंबर, १९९६.**

**पाहाः-** १) शासन निर्णय, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, क्रमांक मत्स्या-११८९/सीआर-११७/पदुम-१४,दि.८.६.१९८९
२) शासन निर्णय, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, क्रमांक मत्स्या-११८९/सीआर-११७/पदुम-१४,दि.१८.३.१९९२.
३) शासन निर्णय, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, क्रमांक मत्स्या-११९३/१९१/पदुम-१४,दि.१.८.१९९४.

**शासन निर्णयः-**

शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्रमांक मत्स्यम-११९३/१७१९/१९१/पदुम-१४,दिनांक १ ऑगस्ट,१९९४ नुसार मच्छिमारांना मासेमारी करताना अपघाती मृत्यू आल्यास/बेपत्ता झाल्यास, त्यांच्या वारसांना रु.२५,०००/- चे अर्थसहाय्य देण्याबददले धोरण विहित करण्यात आले आहे. या धोरणात अंशतः बदल करण्यात येवून आता पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

१) जून १९९६ मध्ये झालेल्या वादळात १२ मच्छिमार मृत्यू पावले असल्याचे निष्पन्न झाले आहे. प्रत्येक मृत मच्छिमारांच्या कुटुंबियांना रुपये १,००,००० चे अर्थसहाय्य (रुपये ५०,००० पंतप्रधान मदत निधीतून + रु.५०,००० राज्य शासनाकडून) शासनाने वितरित केलेलेच आहे. सदरची मदत तातडीने करावी लागल्याने त्याकरिता रु.६,००,०००/- चा निधी तात्पूरत्या स्वरुपात मुख्यमंत्री निधीतून देण्यात आला होता. सदर रु.६,००,०००/- चा निधी मुख्यमंत्री निधीस परत करणे क्रमप्राप्त आहे. तरी मृत्यू पावलेल्या १२ मच्छिमारांच्या वारसांना वाटप केलेल्या रु.६,००,०००/- खर्चास चा निधी तात्पूरत्या स्वरुपात मुख्यमंत्री निधीस परत करणे क्रमप्राप्त आहे. तरी मृत्यू पावलेल्या १२ मच्छिमारांच्या वारसांना वाटप

केलेल्या रु.६,००,०००/- खर्चास याद्वारे कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. तसेच मुख्यमंत्री निधीस रु.६ लाखाची रक्कम (रुपये सहा लाख फक्त) परत करणेस याद्वारे मंजूरी देण्यात येत आहे.

२) याशिवाय सदर वादळात सापडलेल्या इतर मच्छिमारांपैकी ४७ मच्छिमार बेपत्ता आहेत. त्यांच्या वारसांना देखील (प्रत्येक बेपत्ता मच्छिमारांच्या वारसांना) रु.५०,०००/- चे अर्थसहाय्य वितरित करणेस याद्वारे मंजूरी देण्यात येत आहे.

३) मृत्यू पावलेल्या/ बेपत्ता मच्छिमारांच्या वारसांना दयावयाच्या अथसहाय्याची यापूर्वी शासनाने विहित केलेली रु.२५,०००/- ची मर्यादा वाढवून रु.५०,०००/- करण्यास ही याद्वारे मंजूरी देण्यात येत आहे. अशा स्वरुपात अर्थसहाय्य देतानां, मृत/बेपत्ता मच्छिमार हा सहकारी संस्थेचा सभासद असावाच ही विहित केलेली अट ही याद्वारे शिथील करण्यात येत आहे. मात्र सदरचा मच्छिमार क्रियाशील असणे बंधनकारक आहे. शासनाच्या स्थायी धोरणानुसार अशाप्रकारचे अर्थसहाय्य मंजूर करताना विहित अटींची तंतोतंत पर्तता केली जाईल याची आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी दक्षता घ्यावी.

२. या प्रयोजनार्थ शासनाने १९९६-९७ या वर्षात, वित्त विभाग शासन ज्ञापन क्रमांक-आङ्क नि-१९९६/०४९/अर्थसंकल्प-१४, दिनांक २९.८.९६ अन्वये एकूण रुपये ३५,००,०००/- (रुपये पस्तीस लाख फक्त) आकस्मिङ्क ता निधीतून अग्रीम म्हणून मंजूर केली आहे. उपरोक्त खर्च या अग्रीमातून भागविण्यात यावा आणि खालील लेखाशिर्षातंर्गत नोंदविण्यात यावाः-

(१) मागणी क्रमांक डी-८,२४०५-मत्स्यव्यवसाय,
८००-इतर खर्च, ८०० (एक) (बी) मच्छिमारांनी सहाय्य निधी
(२४०५ ०४ ०४) (निधीत गुंतवणूक)

(२) मागणी क्रमांक डी-८,२४०५-मत्स्यव्यवसाय,
८००-इतर खर्च, ८०० (एक) (सी) मच्छिमारांना आपदसहाय्य
(२४०५ ०४ १३) मुख्यमंत्री सहायङ्क ता निधी हस्तांतरण

३. आयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई यांच्याकडे या आदेशान्वये रु.३५ लाख इतकी रक्कम सुपुर्द करण्यात येत आहे. यापैकी रुपये ६ लाखाची रक्कम मुख्यमंत्री निधीस प्रतिपूर्ती करण्याबददलची कार्यवाही आयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई यांनी तात्काळ करावी.

4. - आयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई यांनी आकस्मिङ्क ता निधीतून खर्च करण्यासाठी व मुख्यमंत्री निधीस प्रतिपर्ती करण्यासाठी संबंधितांना आदेशात अग्रीम रक्कम खर्च करताना सादर करण्यात येणाऱ्या देयकावर आकस्मिकता निधी अग्रीम शासन ज्ञापन, वित्त विभाग क्र.आङ्क नि-११९६/०४९/अर्थसंकल्प-१४,दि.२९ ऑगस्ट,१९९६ (संगणक संकेतांक ८००० ०४९ १) अशा स्पष्ट सूचना लाल शाईने अधोरेखित कराव्यात. त्याच प्रमाणे शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.सीएमएफ-१०८३/१४०/अर्थसंकल्प-३,दिनांक २६ एप्रिल,१९८३ व शासन परिपत्रक,वित्त विभाग क्र.सीएनएफ-१०८३/१५३/अर्थसंकल्प-३,दिनांक २८

ऑगस्ट, १९८३ द्वारे केलेल्या सूचनांची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी. आयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई यांनी मंजूर अग्रीमातून प्रत्यक्ष प्रत्यक्ष खर्च केल्याची माहिती वर महिन्यानंतरच्या १५ तारखेपर्यंत वित्त विभाग व कृषि व पदुम विभाग यांना सादर करावी.

5. - उपरोक्त मंजूर केलेल्या आकस्मिकता निधीतून खर्च अंतिमरित्या नियमित उपशिर्ष २४०५-मत्स्यव्यवसाय,८००-इतर खर्च,८००(एक)(सी) मच्छिमारांना आपदसहाय्य (२४०५ ०४ १३) मच्छिमार सहायता निधी हस्तांतरण याखाली नोंदविण्यात यावा.

हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने, त्या विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.३६०/९६/व्यय-१,दिनांक ३०.७.९६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही,
(अ.का.शेख)
उपसचिव, महाराष्ट्र शासन,

प्रति,
आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट राज्य, मुंबई
प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक, मुंबई
जिल्हाधिकारी, मुंबई/ठाणे/रत्नागिरी/रायगड/सिंधुदुर्ग/मुंबई उपनगर जिल्हा.
सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक, मुंबई/पालघर (जि.ठाणे)/अलिबाग/रत्नागिरी/मालवण (जि.सिंधुदुर्ग)
महालेखापाल-१,(लेखा व परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा अधिकारी, मुंबई
वित्त विभाग (व्यय-१,अर्थसंकल्प-१२,अर्थसंकल्प-१३),मंत्रालय, मुंबई
कार्यासन अधिकारी, पदुम-१२,पदुम-१३,पदुम-१६,,कृषि व पदुम विभाग.
सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, ५ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रायलासमोर, मुंबई-३२.
जिल्हा कोषागार ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग,रत्नागिरी
महसुल व वन विभाग.
निवडनस्ती.